## तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

### नियामक मंडळाची १० वी बैठक

दिनांक : १०/१०/२००१

बैठकीस उपस्थित माननीय सदस्य

१. **मा.डॉ.पद्मसिंह पाटील** :
मा.मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. **मा.श्री.बाळासाहेब थोरात** :
मा.राज्यमंत्री (पा) व उपाध्यक्ष,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

३. **मा.श्री.राजाराम गणू महाजन** :
उपाध्यक्ष, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव

४. **मा.श्री.प्रशांत हिरे** :
उपाध्यक्ष, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव

५. **मा.श्री.व्ही.रंगनाथन** :
मुख्य सचिव व पदसिद्ध उपाध्यक्ष,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

६. **मा.श्री.अनुपम दासगुप्ता** :
प्रधान सचिव (वित्त) व सदस्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

७. **मा.श्री.जगदीश जोशी** :
प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

८. **मा.डॉ.सुरेश जोशी** :
प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) व सदस्य,
मंत्राय, मुंबई ४०० ०३२

९. **मा.श्री.नविनकुमार** :
प्रधान सचिव (वने) व सदस्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१०. **मा.श्री.शिवाजीराव देशमुख** :
सचिव (कृषी) व सदस्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

११. **मा.श्री.श्री.य.शुक्ल** :
सचिव (पाटबंधारे) व व्यवस्थापकीय संचालक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

१२. **मा.श्री.सु.वि.सोडल** :
सचिव (लाक्षेवि) व सदस्य,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

## नियामक मंडळाची दहावी बैठक दिनांक १०/१०/२००१

## बैठकीचे कार्यवृत्त

तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची दहावी बैठक दिनांक १०/१०/२००१ रोजी दुपारी ४:०० वाजता मा.मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण विकास महामंडळ वगळून) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे पाटबंधारे विभागाच्या सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मा.मंत्री, मा.उपाध्यक्ष, पदसिद्ध सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.श्री.रोहिदास पाटील | - कृषी व संसदिय कार्यमंत्री (निमंत्रित) |
| २) | मा.श्री.बाळासाहेब थोरात | - राज्यमंत्री (पा) व उपाध्यक्ष. तापी पाटबंधारे विकास महामंडळ |
| ३) | मा.श्री.राजाराम गणू महाजन | - उपाध्यक्ष, तापी पाटबंधारे विकास महामंडळ |
| ४) | मा.श्री.प्रशांत हिरे | - उपाध्यक्ष, तापी पाटबंधारे विकास महामंडळ |
| ५) | मा.श्री.श्री.य.शुक्ल | - सचिव (पा) व व्यवस्थापकीय संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव |
| ६) | मा.श्री.सु.वि.सोडल | - सचिव (लाक्षेवि) |
| ७) | श्री.सुधीर श्रीवास्तव | - प्रधान सचिव (वित्त) यांचे प्रतिनिधी |
| ८) | श्री.ज.ना.चौधरी | - प्रधान सचिव (नियोजन) यांचे प्रतिनिधी |
| ९) | श्री.उमेश देवराज पै | - प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन) यांचे प्रतिनिधी |
| १०) | श्री.प्र.भि.भालेराव | - मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ (निमंत्रित) |
| ११) | श्री.र.भा.भागवत | - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, (निमंत्रित) |

मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात झाली. बैठकीच्या विषयसूचीचे विषयवार वाचन कार्यकारी संचालक यांनी केले. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार बैठकीचे कार्यवृत्त पुढीलप्रमाणे आहे.

(डॉ.पद्मसिंह पाटील)
मंत्री (पा) व अध्यक्ष

प्र. भि. भालेराव
(मु.खं.कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.१ :-** **नियामक मंडळाच्या दिनांक १४/२/२००१ च्या नवव्या बैठकीचे ठराव वाचून कायम करणे.**

नियामक मंडळाच्या दिनांक १४/२/२००१ रोजी झालेल्या नवव्या बैठकीतील पारित ठराव वाचून कायम करण्यात आले व त्यानुसार प्रस्तावित ठराव क्र.१०/१ पारित करण्यात आला.

**विषय क्र.२ :-** **महामंडळाची सन २००१-२००२ ची आर्थिक परिस्थिती व त्यावर उपाययोजना म्हणून प्रस्तावित नवीन निविदेवर निर्बंध टाकणे, तसेच सर्व चालू कामे तुर्त बंद करण्यास नियामक मंडळाची मंजूरी मिळणेबाबत..**

कार्यकारी संचालक यांनी महामंडळाच्या आर्थिक परिस्थितीबाबत थोडक्यात माहिती दिली. सन २००१-२००२ मध्ये उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रलंबित दायित्व व आवश्यक दायित्व वजा जाता उर्वरित निधीतून सध्या सुरु असलेल्या प्रकल्पांना गती देता येणे शक्य नाही. त्यानुषंगाने नवीन निविदांवर निर्बंध टाकणे आवश्यक असून सध्या सुरु असलेल्या कामांच्या प्राधान्यक्रमाबाबत काय निकष असावेत याबाबत मार्गदर्शन व्हावे अशी विनंती केली. याबाबतचे निकष कार्यकारी संचालक यांनी अध्यक्षांच्या निदर्शनास आणून दिले.

या विषयावर विस्तृत चर्चा झाली. आवश्यकतेनुसार सुधारित अंदाजपत्रके तयार करुन त्यास मान्यता घेण्यात यावी, असे प्रधान सचिव (वित्त) यांच्या प्रतिनिधींनी सांगितले. सदर विषयाबाबत कार्यकारी संचालक यांनी मा.मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्याशी चर्चा करुन प्राधान्यक्रम टरवावा, असे ठरले व त्यानुसार ठराव क्र.१०/२ पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| (डॉ.पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.३ :-** **अमरावती धरणाचे पाणी मेथी, कामपूर व विखरण या तलावात सोडणे व लाभक्षेत्रातील १ ल.पा. योजना व २ को.प.बंधारे योजनांचे काम निविदा काढून करण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता घेणे.**

नियामक मंडळाच्या दिनांक २२/११/२००० रोजी झालेल्या आठव्या बैठकीत सदर काम रो.ह.यो. अंतर्गत करण्यास मान्यता देण्यात आली. मा.ना.डॉ.हेमंत देशमुख यांनी सदर काम निविदा काढून करावे अशी मागणी केली असून मा.अध्यक्ष यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या आहेत असे कार्यकारी संचालक यांनी सांगितले. सदर प्रस्तावास सहमती दर्शविण्यात आली नाही त्यामुळे प्रस्तावित ठराव क्र.१०/३ पारित झाला नाही.

**विषय क्र.४ :-** **विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य यांचेकडून होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकल्पांच्या मागण्यांसंदर्भात प्रकल्पांच्या सर्वेक्षणाबाबत धोरण ठरविणे.**

काही वेळा तापी खोऱ्याच्या आराखड्याबाहेरील मागण्या विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य यांच्याकडून होत असतात तेंव्हा अशा प्रकारच्या मागण्यांसंदर्भात प्रकल्पांच्या सर्वेक्षणाची कामे करावी किंवा कसे यावर नियामक मंडळाचे मार्गदर्शन व्हावे. अशी विनंती कार्यकारी संचालक यांनी केली.

याविषयावरील चर्चेत मा.उपाध्यक्ष श्री.प्रशांत हिरे यांनी पाण्याची उपलब्धता तपासणे आवश्यक आहे असे सांगितले. त्यावर मा.अध्यक्ष यांनी पाण्याची उपलब्धता तपासून घ्यावी अशा सूचना दिल्या. मागणी केलेल्या प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध नसेल व मागणी केलेले प्रकल्प मंजूर आराखड्यात समाविष्ट नसतील तर अशा प्रकल्पांच्या सर्वेक्षणाची कामे करु नयेत असे मा.मंत्री (कृषी) व संसदिय कार्यमंत्री यांनी सांगितले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते ठराव क्र.१०/४ पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| **(डॉ.पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.५ :-** **रावेर तालुक्यातील मौजे केऱ्हाळे बु., केऱ्हाळे खु. व पिंप्री या गावांसाठी मंगरुळ धरणाचे पाणी नदीपात्रात सोडणेबाबत.**

मौजे केऱ्हाळे खु., केऱ्हाळे बु. व पिंप्री या गावांच्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी मंगरुळ धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी मा.आमदार व उपाध्यक्ष श्री.रा.ग. महाजन यांनी केली होती. त्यावर मा.अध्यक्ष यांनी पाणीपट्टीची मागणी न करता आवश्यकतेप्रमाणे नदीपात्रात पाणी सोडावे असे आदेश दिले होते. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली असून त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी अशी विनंती कार्यकारी संचालक यांनी केली. त्यावर सहमती दर्शविण्यात येऊन सर्वानुमते प्रस्तावित ठराव क्र.१०/५ पारित करण्यात आला.

**विषय क्र.६ :-** **पुनर्वसित गावठाणात अनुज्ञेय नागरी सुविधा व्यतिरिक्त इतर सुविधा पुरविणेबाबत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या, आवश्यकतेनुसार मान्य करण्याचे मंत्रीमंडळाचे अधिकार मा.अध्यक्ष, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांना देण्याबाबत विनंती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देणे.**

सदर विषयावरील चर्चेत मा.अध्यक्ष यांनी अशा प्रकारचे अधिकार देता येतात काय ? अशी विचारणा केली. त्यावर सचिव (पा) यांनी त्यासाठी सदर विषय मंत्रीमंडळापुढे ठेवावा लागेल व तत्पूर्वी नियामक मंडळात तसा ठराव मान्य करावा लागेल असे सांगीतले. परंतु असा ठराव करु नये असे मत त्यांनी व्यक्त केले. कृष्णा खोरे महामंडळात अशा प्रकारचा ठराव झालेला असून मंत्रीमंडळापुढे कृष्णा खोरे महामंडळाचा विषय मांडण्यांत आल्यास त्याप्रमाणे या महामंडळाचादेखील विचार व्हावा, असे मा.मंत्री (कृषी) व संसदिय कार्यमंत्री यांनी सांगितले. सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आला व त्यामुळे प्रस्तावित ठराव क्र.१०/६ पारित झाला नाही.

| | |
|---|---|
| **(डॉ.पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.७ :-** **निम्न पांझरा (अक्कलपाडा) मध्यम प्रकल्प ता.साक्री जि.धुळे या प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या तामसवाडी ता.साक्री या गावाच्या पुनर्वसन कामांतर्गत विशेष बाब म्हणून गावठाणातील टेकडीचे सपाटीकरण करण्यास मान्यता देणे.**

सदर विषय हा सर्वानुमते अमान्य करण्यात आल्यामुळे प्रस्तावित ठराव क्र.१०/७ पारित झाला नाही.

**विषय क्र.८ :-** **वाघूर प्रकल्प मौजे हिंगणे (बु) ता.जामनेर पुनर्वसित गावातील घरांना वाढीव मोबदला मिळणेबाबत व वाढीव गावठाण संपादन होणेबाबत शासनास मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देणे.**

सदर पुनर्वसनाच्या कामास शासनाच्या बाजूने विलंब झाला असल्यामुळे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करावा लागेल असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. प्रधान सचिव (वित्त) यांचे प्रतिनिधींनी याबाबत शासन स्तरावर पत्रव्यवहार करावा असे सूचविले. मा.अध्यक्ष यांनी याविषयी तपशिलवार माहिती संकलित करावी व प्रस्ताव शासनास सादर करावा अशा सूचना दिल्या व त्यानुसार प्रस्तावित ठराव क्र.१०/८ पारित करण्यात आला.

**विषय क्र.९ :-** **ग्रामीण पायाभूत विकास निधी (R.I.D.F.). कार्यक्रमांतर्गत कर्ज सहाय्यासाठी प्रस्तावित प्रकल्पांना आर्थिक तरतूद प्राथम्याने करण्यास मान्यता देणे.**

सदर विषयावर चर्चा होऊन सर्वानुमते प्रस्तावित ठराव क्र.१०/९ पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| **(डॉ.पद्मसिंह पाटील)** | प्र.क्रि. ... **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**विषय क्र.१० :-** **मंगरुळ मध्यम प्रकल्प ता.रावेर या प्रकल्पाच्या कामासाठी खदानीकरीता संपादन केलेली, मौजे केऱ्हाळे खु. ता.रावेर येथील २९.३० हे. जमिन श्री ओंकारेश्वर सहकारी साखर कारखान्यास देण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देणे.**

वरील विषयाच्या चर्चेत प्रधान सचिव (वित्त) यांच्या प्रतिनिधींनी याबाबतची कार्यवाही शासनाच्या महसूल संहितेतील नियमानुसार करावी असे सांगितले. सदर विषयाचा प्रस्ताव शासनाला सादर करावा अशा सूचना मा.अध्यक्ष यांनी दिल्या. व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव क्र.१०/१० पारित करण्यात आला.

**विषय क्र.११ :-** **तापी नदीवरील पिंप्री नांदू पुलावर पथकर बसवून कंत्राटी पद्धतीने वसूली करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देणे.**

वरील विषयावर चर्चा होऊन सर्वानुमते प्रस्तावित ठराव क्र.१०/११ पारित करण्यात आला.

**विषय क्र.१२ :-** **नारपार खोऱ्यातील दमणगंगा (नारपार) योजनेंतर्गत प्रस्तावित 'मांजरपाडा' मध्यम प्रकल्प ता.सुरगाणा जि.नाशिक या प्रकल्पाच्या प्राथमिक प्रकल्प अहवालास मान्यता देणे तसेच या प्रकल्पाच्या सखोल सर्वेक्षणाकरीता रु.२० लक्ष निधी उपलब्ध करण्यास मान्यता देणे.**

वरील विषयावर चर्चा होऊन सर्वानुमते प्रस्तावित ठराव क्र.१०/१२ पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| **(डॉ.पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.१३ :-** **धुळे शहराच्या मध्यवस्तीतून जाणाऱ्या व सध्या वापरात नसलेल्या धुळे पाटाच्या निष्कासनाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता देणे.**

वरील विषयाच्या चर्चेत मा.मंत्री (कृषि) व संसदिय कार्यमंत्री यांनी वापरात नसलेला सदर पाट निष्कासित करण्याऐवजी पुनर्जिवीत करण्याचा प्रस्ताव मा.मंत्री (पा) यांचेमार्फत पाठविला असल्याचे सांगीतले. मा.अध्यक्ष यांनी याप्रमाणे सदर पाट सुरु करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तपासून घ्यावा अशा सूचना दिल्या. सर्वानुमते सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आल्याने प्रस्तावित ठराव क्र.१०/१३ पारित झाला नाही.

**विषय क्र.१४ :-** **धुळे शहराच्या मध्यवस्तीतून जाणाऱ्या व सध्या वापरात नसलेल्या कालव्यावरील अतिक्रमणे काढण्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणे.**

वरील विषयावर चर्चा होऊन सध्या वापरात नसलेल्या पण सदर कालवा पुनर्जिवीत करण्यासाठी कालव्यावरील अतिक्रमणे काढण्यास येणाऱ्या रु.३,८४,६४१/- रकमेच्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली व त्यानुसार ठराव पारित करण्यात आला.

**विषय क्र.१५ :-** **मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.**

**विषय क्र.१५/१ :-** **हतनूर प्रकल्पाच्या कालव्यालगत असलेल्या शेतजमिनींचे नुकसान टाळण्यासाठी करावयाच्या कामांना मान्यता देणे.**

मा.उपाध्यक्ष श्री.रा.ग.महाजन यांनी, हतनूर कालव्याच्या कि.मी.१३ पर्यंत पाावसाचे पाणी वाहून जाण्यास कालव्यावर मोऱ्या बांधणे व हतनूर कालव्याच्या खाली कालव्यातील पाणी पाझरल्याने उदळी-लुमखेडा शिवारातील दलदल जमिनीत चर खोदणे अशा मागण्या केल्या असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगीतले. सदर विषयावर चर्चा होऊन सर्वानुमते प्रस्ताव मान्य करण्यात आला व त्यानुसार ठराव क्र.१०/१५/१ पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| (डॉ.पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

**विषय क्र.१५/२ :- हतनूर धरणावरील विश्रामगृहात सुधारणा करणे व हतनूर धरण व वसाहतीकरिता कंपांऊंड भिंत बांधणे या कामांना मान्यता देणे.**

मा.उपाध्यक्ष श्री.राजाराम गणू महाजन यांनी सदर मागणी केली असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले. सदर विषयावरील चर्चेत सचिव (पा) यांनी, गोळे समितीने हतनूर धरणाला १० अतिरिक्त गेट बसविण्याचे सूचविले असून पुच्छ कालवा विश्रामगृहाजवळून जात असल्याने भविष्यात तेथील रस्त्यास धोका संभवतो त्यामुळे विश्रामगृहात सुधारणा करण्यात येऊ नये तथापी अत्यावश्यक किरकोळ दुरुस्ती करण्यास हरकत नाही असे मत मांडले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली. तसेच हतनूर धरण वसाहतीकरिता सध्या कंपाऊंड बांधण्यात येऊ नये असे ठरले व त्यामुळे ठराव क्र.१०/१५/२ पारित झाला नाही.

**विषय क्र.१५/३ :- सहकारी पाणीवापर संस्था स्थापन करणेबाबत**

पाणीवापर संस्थांची नोंदणी व लाभक्षेत्र हस्तांतरणास चालना देण्यासाठी प्रस्तावित उपाययोजना व कार्यपद्धती याविषयीची माहिती कार्यकारी संचालक यांनी मांडली. त्यास सर्वांनी सहमती दर्शविली व त्यानुसार सर्वानुमते प्रस्तावित ठराव क्र.१०/१५/३ पारित करण्यात आला.

**विषय क्र.१५/४ :- आर्थिक वर्ष २००१-२००२ मध्ये कर्जरोखे मालिका-६ द्वारा रु.३०० कोटी उभारण्यास मान्यता देणे.**

सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला व त्यानुसार प्रस्तावित ठराव क्र.१०/१५/४ पारित करण्यात आला.

**विषय क्र.१५/५ :- कर्जरोखे मालिका-६ संदर्भात विश्वस्त संस्था म्हणून "दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्यूटर कंपनी लि., सातारा" यांना त्यांच्या सहमतीने नेमण्यास मान्यता देणे.**

सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला व त्यानुसार प्रस्तावित ठराव क्र.१०/१५/५ पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| (डॉ.पद्मसिंह पाटील) | (मु.खं.कुलकर्णी) |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**विषय क्र.१५/६ :-** **"कर्जरोखे मालिका-६ मधील रोखे वितरण करण्यासाठी महामंडळ, महाराष्ट्र शासन व विश्वस्त संस्था यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यास मान्यता देणे."**

सदर प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला व त्यानुसार प्रस्तावित ठराव क्र.१०/१५/६ पारित करण्यात आला.

**विषय क्र.१५/७ :-** **तापी नदीचे पाणी प्रकाशा बॅरेजमधून उपसा सिंचनाने बोगद्याद्वारे मोसम नदीत टाकणेच्या प्रस्तावास मान्यता देणे.**

मा.उपाध्यक्ष श्री.प्रशांत हिरे यांनी सदर मागणी केली असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सगितले. याविषयीच्या चर्चेत मा.मंत्री, कृषी व संसदिय कार्यमंत्री यांनी सदर प्रस्ताव अव्यवहार्य असल्याचे सांगितले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली. सदर प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यात आला व त्यामुळे प्रस्तावित ठराव क्र.१०/१५/७ पारित झाला नाही.

**विषय क्र.१५/८ :-** **पांझरा धरणाचे पाणी उपसा सिंचनाने हरणबारी धरणात टाकण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे.**

मा.उपाध्यक्ष श्री.प्रशांत हिरे यांनी सदर मागणी केली असल्याचे कार्यकारी संचालक यांनी सगितले. याविषयीच्या चर्चेत मा.मंत्री, कृषी व संसदिय कार्यमंत्री यांनी सदर प्रस्ताव अव्यवहार्य असल्याचे सांगितले. त्यास मा.अध्यक्ष यांनी सहमती दर्शविली. सदर प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यात आला व त्यामुळे प्रस्तावित ठराव क्र.१०/१५/८ पारित झाला नाही.

**विषय क्र.१५/९ :-** मालेगांव तालुक्यातील गिरणा नदीवरील दाभाडी व मोसम नदीवरील काष्टी येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केलेले असून त्यास त्वरीत प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी विनंती मा.उपाध्यक्ष श्री.प्रशांत हिरे यांनी केली. सदर बंधारे हे ब्रिटीशकालीन बंधारे असून गिरणा नदीच्या जलनियोजनात पूर्वी ते पकडण्यात आलेले आहेत असे त्यांनी सांगितले. गिरणा धरणाच्या पाणी उपलब्धतेवर या योजनांचा परिणाम होईल ही बाब सचिव (पा) व व्यवस्थापकीय संचालक यांनी निदर्शनास आणून दिली. पाणी उपलब्धता तपासून पहाण्याच्या सूचना अध्यक्षांनी दिल्या.

| | |
|---|---|
| **(डॉ.पद्मसिंह पाटील)** | **(मु.खं.कुलकर्णी)** |
| मंत्री (पा) व अध्यक्ष | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

## नियामक मंडळाची दहावी बैठक दिनांक १०/१०/२००१

## बैठकीत मान्य झालेले ठराव

ठराव क्र.१०/१ : ठराव करण्यात येतो की, "नियामक मंडळाच्या नवव्या बैठकीत पारित झालेले ठराव वाचून कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र.१०/२ : ठराव करण्यात येतो की, "महामंडळांतर्गत जी कामे सुरु आहेत त्यांच्या प्राधान्यक्रमाच्या निकषाबाबत कार्यकारी संचालक यांनी मा.अध्यक्ष यांचेशी स्वतंत्रपणे चर्चा करुन प्राधान्यक्रम ठरवावा यास नियामक मंडळाची मान्यता आहे."

ठराव क्र.१०/३ : सदर विषय अमान्य करण्यात आल्याने प्रस्तावित ठराव पारित झाला नाही.

ठराव क्र.१०/४ : ठराव करण्यात येतो की, "विधानसभा सदस्य/विधान परिशद सदस्य यांच्याकडून होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकल्पांच्या मागण्यासंदर्भात, मागणी केलेल्या प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध नसेल व प्रकल्पांचा महामंडळाच्या आराखड्यात समावेश नसेल तर अशा प्रकल्पांच्या सर्वेक्षणाची कामे करण्यात येऊ नयेत या धोरणास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.१०/५ : ठराव करण्यात येतो की, "रावेर तालुक्यातील केऱ्हाळे बु., केऱ्हाळे खु. व पिंप्री या गावांसाठी मंगरुळ मध्यम प्रकल्पाचे पाणी, पाणीपट्टी न आकारता नदीपात्रात सोडण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.१०/६ : सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आल्याने प्रस्तावित ठराव पारित झाला नाही.

ठराव क्र.१०/७ : सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आल्याने प्रस्तावित ठराव पारित झाला नाही.

ठराव क्र.१०/८ : ठराव करण्यात येतो की, "वाघूर प्रकल्पामुळे बाधीत मौजे हिंगणे बु. ता.जामनेर येथील संपादित घरांच्या फरकाची रक्कम व विस्तारित गावठाणाचे पुनर्वसन यासाठी येणाऱ्या रु.२१८.१५ लक्ष अंदाजित खर्चास विशेष बाब म्हणून मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.१०/९ : ठराव करण्यात येतो की, "महामंडळांतर्गत असलेल्या नाबार्ड कर्ज सहाय्यीत प्रकल्पांना निधीच्या उपलब्धतेनुसार दरवर्षी आवश्यक

(डॉ.पद्मसिंह पाटील)
मंत्री (पा) व अध्यक्ष

(मु.खं.कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

तेवढी तरतूद प्राथम्याने करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१०** : ठराव करण्यात येतो की, "मंगरुळ मध्यम प्रकल्पाच्या माती भरावासाठी व इतर कामांसाठी, मौजे केऱ्हाळे खु. ता.रावेर येथील २९.३० हे. संपादित जमिन श्री ओंकारोश्वर सहकारी साखर कारखान्यास देण्याचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता आहे."

**ठराव क्र.१०/११** : ठराव करण्यात येतो की, "तापी पाटबंधारे विकास महामंडळामार्फत हतनूर धरणाच्या जलाशयावर तापी नदीवर बांधण्यात आलेल्या पिंप्री नांदू ता.मुक्ताईनगर येथील पुलावर पथकर बसवून एक वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने वसुली करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१२** : ठराव करण्यात येतो की, "नार-पार खोऱ्यातील दमणगंगा योजनेंतर्गत प्रस्तावित 'मांजरपाडा' ता.सुरगाणा जि.नाशिक या मध्यम प्रकल्पाच्या प्राथमिक अहवालास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे. तसेच या योजनेच्या सखोल सर्वेक्षणासाठी रु.२० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१३** : सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आल्याने प्रस्तावित ठराव पारित झाला नाही.

**ठराव क्र.१०/१४** : ठराव करण्यात येतो की, "धुळे शहराच्या मध्यवस्तीतून जाणाऱ्या व सध्या वापरात नसलेल्या कालव्यावरील अतिक्रमणे काढण्यासाठी येणाऱ्या रु.३,८४,६४१ एवढ्या अंदाजित खर्चास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**<u>आयत्या वेळचे विषय -</u>**

**ठराव क्र.१०/१५/१** ठराव करण्यात येतो की, "हतनूर कालव्यालगत असलेल्या शेतजमिनींचे नुकसान टाळण्यासाठी, दलदल जमिनीत चर खोदणे व कालव्यावर मोऱ्या बांधणे या प्रस्तावित असलेल्या रु.१८.२५ लक्ष किंमतीच्या कामांना नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१५/२** सदर विषय सर्वानुमते अमान्य करण्यात आल्याने ठराव पारित झाला नाही.

**ठराव क्र.१०/१५/३** ठराव करण्यात येतो की, "सहकारी पाणीवापर संस्थांची नोंदणी व

**(डॉ.पद्मसिंह पाटील)**
मंत्री (पा) व अध्यक्ष

**(मु.खं.कुलकर्णी)**
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

# तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव

लाभक्षेत्र हस्तांतरणास चालना देण्यासाठी विषयसूचीत प्रस्तावित केलेल्या उपाययोजनेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१५/४** — ठराव करण्यात येतो की, "सन २००१-२००२ मध्ये कर्जरोखे मालिका-६ द्वारा रु.३०० कोटीचा निधी उभारण्यास व उद्दीष्टापेक्षा जास्त रक्कम प्राप्त झाल्यास महामंडळाकडेच ठेवण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१५/५** — ठराव करण्यात येतो की, "महामंडळाच्या प्रस्तावित कर्जरोखे मालिका-६ साठी विश्वस्त संस्था म्हणून, दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झीक्युटर कंपनी लि. सातारा या वित्तीय संस्थेस त्यांच्या सहमतीने नेमण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१५/६** — ठराव करण्यात येतो की, "कर्जरोखे मालिका-६ मधील रोखे वितरण करण्यासाठी आवश्यक

१) तापी पाटबंधारे विकास महामंडळ,

२) महाराष्ट्र शासन,

३) विश्वस्त संस्था (दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झीक्युटर कंपनी लि. सातारा)

यातील त्रिपक्षीय करार करण्यास तसेच महामंडळातर्फे या करारावर व्यवस्थापकीय संचालकांच्या सहमतीने स्वाक्षरी करण्यास कार्यकारी संचालकांना प्राधिकार देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र.१०/१५/७** — सदर विषय अमान्य करण्यात आल्याने ठराव पारित झाला नाही.

**ठराव क्र.१०/१५/८** — सदर विषय अमान्य करण्यात आल्याने ठराव पारित झाला नाही.

(डॉ.पद्मसिंह पाटील)
मंत्री (पा) व अध्यक्ष

(मु.खं.कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव